नांदेडला ऑगस्टमध्ये नैसर्गिक आपत्तीत १५ जणांचा मृत्यू

दीड हजार घरांची पडझड; ६० टक्के शेतीचे नुकसान

लोकसत्ता वार्ताहर

नांदेड : ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टी आणि पुरामुळे नांदेड जिल्ह्याला जबर तडाखा बसला. वीज पडून, पुरात वाहून व अन्य कारणांमुळे जिल्ह्यातील १५ व्यक्तींचा मृत्यू झाला. तर विविध प्रकारची २१५ जनावरे दगावली. १ हजार ४९९ घरांची पडझड झाली. ४ हजार ४६३ कुटुंबांतील १५ हजार १५ व्यक्तींना सुरक्षितस्थळी हलवावे लागले. तर ५ लाख ८ हजार ४२५ हेक्टरवरील शेतीचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

जुलै अखेरपर्यंत आणि नंतर ऑगस्टच्या १३ तारखेपर्यंत जिल्ह्यात काही भागांत अतिवृष्टी झाली, तरीही परिस्थिती, पीकस्थिती नियंत्रणात होती. परंतु, स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला सुरू झालेला पाऊस नंतर दोन दिवस चालला. यांत विविध महसूल मंडळांत अतिवृष्टीची नोंद झाली. मुखेड तालुक्यातील बऱ्हाळी येथे विक्रमी असा ३५५ मि.मी. पाऊस अवघ्या २४ तासांत झाला. याशिवाय १०० मि.मी.पेक्षा अधिक पाऊस झाला. त्यामुळे मुखेड तालुक्यात गंभीर परिस्थिती उद्भवली. लेंडी नदीच्या घळभरणीचे काम वादग्रस्त ठरले. यात पाच जणांचा जीव गेला.

त्यानंतर जेमतेम ८ दिवसांनंतर पुन्हा एकदा नांदेड जिल्ह्याला अतिवृष्टीने झोडपले. ९३ पैकी ६९ मंडळांत अतिवृष्टीची नोंद झाली. याचा फटका माहूर वगळता सर्व १५ तालुक्यांना बसला. या नैसर्गिक आपत्तीत वीज पडून किनवट तालुक्यात एक जण ठार झाला. पुरात वाहिल्याने विविध ठिकाणी १२ जणांचा तर अन्य कारणाने दोन अशा एकूण १५ जणांचा मृत्यू झाला. त्यापैकी १० जणांना प्रत्येकी ४ लाख या प्रमाणे ४० लाख रुपयांची मदत देण्यात आली. उर्वरित प्रकरणात कारवाई सुरू आहे.

दुधाळ, ओढकाम, करणाडी व लहान वासरे अशी एकूण २१५ जनावरे दगावली असून, पैकी २५ प्रकरणांत ८ लाख २४ हजार रुपयांचे वाटप झाले. अन्य प्रकरणांत कारवाई सुरू आहे. जिल्ह्यातील १६६ अंशतः पडझड झालेल्या पक्क्या घरमालकांना प्रत्येकी ६५००, अंशतः पडझड झालेल्या कच्चा घरमालकांना प्रत्येकी ४ हजार तर झोपडी मालकांना प्रत्येकी ३ हजार या प्रमाणे एकूण १४९९ प्रकरणांपैकी ११ प्रकरणांत ४४ हजार रुपयांचे प्रत्यक्ष वाटप झाले. उर्वरित प्रकरणांसाठी निधी प्राप्त असून, वाटप सुरू असल्याचे कळविण्यात आले. याशिवाय तात्पुरते निराधार व स्थलांतरित झालेल्या ४ हजार ४६३ कुटुंबांतील १७ हजार १५ सदस्यांना सुद्धा मदत देण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, जिल्ह्यातील १ हजार ५३२ गावांतील ६ लाख ५३ हजार ९६५ शेतकरी यांना जोरदार पाऊस व अतिवृष्टीचा जबर तडाखा बसला. यामुळे ५ लाख ६ हजार ८२६ हेक्टर क्षेत्रावरील कोरडवाहू शेती, १४०६ हेक्टरवरील बागायत १९३ हेक्टरवरील फळबागा असे एकूण ५ लाख ८ हजार ४२५ हेक्टर क्षेत्रावरील शेतीपिकांचे पूर्णपणे नुकसान झाले असून, त्याची टक्केवारी ६५.८० टक्के एवढी भरते. दरम्यान, ४ लाख १५ हजार ६२४ शेतकऱ्यांच्या ३ लाख ४ हजार ७६१ हेक्टर क्षेत्रावरील नुकसानीचे पंचनामे झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.

बालिकेवर अत्याचार करणारा आरोपी गजाआड

आज मूक मोर्चा, परळी बंदचेही आवाहन

लोकसत्ता वार्ताहर

बीड : परळी येथील रेल्वे स्थानक परिसरात बालिकेवर अत्याचार करणाऱ्यास संभाजीनगर पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी तपासाचे चक्र फिरवत अधिकाऱ्यांनी रेल्वे स्टेशन तसेच परिसरातील सीसीटीव्ही तपासले होते. यामध्ये सदर आरोपी बालिकेला सोबत घेऊन जाताना दिसून आला होता त्यानुसार परळी शहरातील बरकतनगर भागातील आरोपीला पोलिसांनी अटक केली.

न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायालयाने आरोपीला ४ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलीस अधीक्षकांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे याबाबतची माहिती दिली. बालिकेवर अत्याचार प्रकरणी गुरुवारी परळीत मूकमोर्चा काढण्यात येणार आहे. परळी बंदचे आवाहन देखील नागरिकांकडून करण्यात आले. पंढरपूर येथून कामाच्या शोधात परळीत आलेल्या दाम्पत्याच्या चार वर्षांच्या बालिकेवर रेल्वे स्थानक परिसरात अत्याचार केल्याची घटना रविवारी दुपारी घडली होती.

पीडित बालिकेवर अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आरोपी सज्जात अल्बक्ष शेख याला न्यायालयात हजर करण्यात आले होते. यावेळी अंबाजोगाई विशेष न्यायालयाने आरोपीला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पाच तासांतच आरोपीला अटक

रविवारी दुपारी झालेल्या घटनेनंतर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली. अंबाजोगाईचे पोलीस उपाधीक्षक ऋषिकेश शिंदे हे तत्काळ घटनास्थळी दाखल होत त्यांनी तपास सुरू केला. स्थानिक गुन्हे शाखा आणि संभाजीनगर पोलीस यांच्या मदतीने पोलिसांनी आरोपीला पाच तासांतच गजाआड केले.

'जलदगती न्यायालयात सुनावणी घ्या'

रेल्वे स्थानक परिसरात बालिकेच्या अत्याचार प्रकरणी नागरिकांकडून आज राणी लक्ष्मीबाई टॉवरपासून मूक मोर्चा काढला जाणार आहे. याबरोबर परळी बंदचे आवाहन देखील करण्यात आले आहे. या प्रकरणातील आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी तसेच हे प्रकरण जलद गती न्यायालयात चालवण्यात यावे, अशी प्रमुख मागणीचे निवेदन परळी शहर पोलिसांना देण्यात आले आहे. **-अरुण पाठक,** निवेदनकर्ते

बीडमधील आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्यासाठी तपासणी

अप्पर जिल्हा दंडाधिकाऱ्यांचे आदेश

लोकसत्ता वार्ताहर

बीड : मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईमध्ये मराठा आरक्षण आंदोलनात दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याची मागणी करण्यात आली होती. याविषयीची कार्यवाही आता बीड प्रशासनाने सुरू केल्याचे दिसून येत आहे. अप्पर जिल्हादंडाधिकारी यांनी या संदर्भाचे निर्देश दिले आहेत. उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून, या समितीने संबंधित उपविभागात दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याच्या संदर्भात आपला अहवाल द्यायचा आहे.

हा अहवाल सादर झाल्यानंतर गुन्हे मागे घेण्याच्या संदर्भात वरिष्ठ पातळीवर निर्णय घेतला जाऊ शकतो. या समित्या यापूर्वीच गठीत करण्यात आलेल्या असल्या तरी त्यांच्याकडून अहवाल मात्र आले नव्हते ते अहवाल आता सादर करण्याच्या सूचना देत प्रशासनाने जरांगे यांच्या मागण्याविषयी सकारात्मक हालचाल सुरू केल्याचेच पाहायला मिळत आहे.

कोणते गुन्हे मागे घेतले जाणार

राजकीय, सामाजिक आंदोलनामधील गुन्हे मागे घेण्याच्या संदर्भात शासनाने निर्देश दिलेले असून. ज्या घटनेत जीवितहानी झालेली नाही आणि जेथे सार्वजनिक अथवा खासगी मालमत्तेचे पाच लाखांपेक्षा अधिकचे नुकसान झालेले नाही, अशा प्रकरणात आरोपींनी नुकसान भरपाई देण्याची तयारी दाखवली तर गुन्हे मागे घेतले जाऊ शकतात.

यंदाच्या शिक्षक पुरस्कारावर सुट्यांचे सावट

वितरण सोहळा लांबण्याची चिन्हे

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : जिल्हा परिषदांकडून देण्यात येणाऱ्या आदर्श शिक्षक पुरस्कारावर मराठा आंदोलनाचे सावट आणि ५ सप्टेंबर रोजीच ईद-ए-मिलादची शासकीय सुटी, तर ६, ७ तारखेला गणपती विसर्जन आणि रविवार, अशा सलग तीन दिवस सुटी आल्याने वितरण सोहळा पुन्हा लांबण्याची चिन्हे आहेत.

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून देण्यात येणारे गतवर्षीचेही आदर्श शिक्षक पुरस्कार रखडले आहेत. गतवर्षीसह यंदाचेही पुरस्कार या वर्षी द्यावे लागणार असून, तशी भूमिका शिक्षक संघटनांकडूनही घेण्यात आली आहे. गतवर्षी छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेकडून शिक्षकांऐवजी सुंदर शाळांना आदर्श पुरस्कार देऊन गौरवण्यात आले होते. तत्कालीन एका अधिकाऱ्यास काही मंडळींनी शिक्षकांबाबत चुकीची माहिती दिल्याने त्यांनी 'सुंदर शाळां'ना पुरस्कार देण्याच्या सूचना केल्याचे काही शिक्षक संघटनांकडून सांगण्यात आले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नऊ तालुक्यांमधील प्राथमिक व माध्यमिक विभागातून प्रत्येकी नऊ आदर्श शिक्षकांची निवड करून दर वर्षी सोहळ्याच्या माध्यमातून सन्मान केला जातो. गतवर्षी पुरस्कार रखडले, तर यंदाच्या पुरस्कारांवर सुटी व मराठा आंदोलनाचे सावट असल्याने सोहळा पुढे ढकलण्याची चिन्हे दिसत आहेत.

गतवर्षीचे रखडलेले पुरस्कार विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. त्यांनी गतवर्षीचे व यंदाचे मिळून एकत्रच आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात येतील, असे शिक्षक संघटनांना आश्वस्त केले आहे. यापूर्वीही एका वर्षी पुरस्कार वितरणाचा सोहळा झालेला नव्हता. त्यानंतरच्या वर्षी सलग दोन वर्षांच्या पुरस्कारांचे वितरण झाले होते. **-राजेश हिवाळे,** जिल्हाध्यक्ष, म. रा. प्रा. शिक्षक संघ

आदर्श शिक्षकांच्या नावांची यादी शिक्षण विभागाने तयार करून विभागीय आयुक्तांकडे पाठवण्यात आली आहे. त्यांच्याकडून मंजुरी मिळाल्यानंतर आणि पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत वितरण सोहळा होणार आहे. यंदा ५ सप्टेंबर रोजी शासकीय सुटी आल्याने तारीखही निश्चित केली जाईल. **-जयश्री चव्हाण,** शिक्षणाधिकारी

वादग्रस्त चलचित्रफीत; तिघांवर गुन्हा

जालना : वादग्रस्त ध्वनिचित्रफीत समाज माध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर अस्लम महेमूद कुरेशी याच्यासह दोन अनोळखी व्यक्तींच्या विरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण (सुधारणा) कायद्यान्वये जालना शहरात गुन्हा नोंदविण्यात आला.

धार्मिक भावना दुखावण्याच्या उद्देशाने शिविगाळ करण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सोमवारी रात्री घडलेली घटना वेगळी असून वादग्रस्त ध्वनिचित्रफितीशी संबंध नसल्याचे जिल्हा पोलिस अधीक्षक अजय कुमार बन्सल यांनी घटनास्थळास भेट दिल्यानंतर सांगितले.

आंदोलकांच्या तक्रारीनंतर मंगळवारी महापालिकेने शहरातील चार अनधिकृत कत्तलखान्यांवर कारवाई केली.

बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

क्षेत्रिय कार्यालय दबावग्रस्त अस्ति वसूली शाखा, अमरावती

C/O M.I.D.C. शाखा प्लॉट क्रमांक 39 "सूर्या",फरशी स्टॉप रोड, दस्तूर नगर, अमरावती (महा.), 444606

जंगम/ स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना

"परिशिष्ट-IV-A [नियम 8 (6) आणि 6(2) ची तरतूद पहा]

सिक्यूरिटी इंटरेस्ट (ईन्फोर्समेंट) रुल्स 2002 च्या नियम 8 (6) आणणि 6(2) च्या तरतुदीसह सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फाइनैंशियल अॅसेटस अँन्ड ईन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट 2002 च्या अंतर्गत जंगम/ स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना .

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषत: कर्जदार, गहाणदार आणि जामीनदारांना नोटीस दिली जाते की खाली वर्णन केलेली जंगम/ स्थावर मालमत्ता सुरक्षित कर्जदाराकडे गहाण/आकारणी केली आहे, ज्याचा ताबा कर्जदाराने घेतला आहे. बँक ऑफ बडोदाचे अधिकृत अधिकारी, सुरक्षित कर्जदार, खाली नमूद केलेल्या खात्यांतील थकबाकी वसूल करण्यासाठी **"जसे आहे तेथे", "जसे आहे तसे", आणि "जे काही आहे"** या आधारावर विकले जातील. कर्जदार/S/गहाणदार/जमीनदार/S/सुरक्षित मालमत्ता/S/देय/राखीव किंमत/ई-लिलावाची तारीख आणि वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचे तपशील खाली नमूद केले आहेत.

अनु./ लॉट क्र.	कर्जदार/जमानतदार/ गहाणदार यांचे नाव आणि पत्ता	जंगम/ स्थावर मालमत्तेचे वर्णन (गहाणदार)	13(2) सूचनेनुसार एकूण देय रुपयांमध्ये	1. राखीव किंमत 2. अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) 3. बिड वाढीव रक्कम	ई-लिलावाची तारीख ई लिलावाची वेळ - प्रारंभ वेळ ते समाप्ती वेळ	ताब्यात घेण्याची स्थिती (रचनात्मक/ वास्तविक)	मालमत्ता तपासणी तारीख आणि वेळ.
1	**मेसर्स एम एस एंटरप्राइजेस, प्रोप्रा.- मोहम्मद शफी मोहम्मद अश्रफ जमानतदार - मोहम्मद अश्रफ S/0 मोहम्मद शरीफ आणि शेख फरजाना W/0. मोहम्मद शेख अश्रफ, संपूर्ण राहणार :** घर नं. 848, प्लॉट नं. 1, साकळा प्लॉट, लोहगाव रोड, परभणी **जमानतदार- 1) शेख उबेद S/0. शेख दाऊद 2) शेख दाऊद S/0. शेख चांद दोन्ही राहणार :** नसरतपूर(बेचिराग), बसमत, तालुका बसमत जिल्हा हिंगोली.	नोंदणीकृत गहाण असलेले घर संपत्ती नं. 848 (पीटीआर मालमत्ता नं. 305) वार्ड नं. 17 (जुना) वार्ड नं. 16 (नविन) ज्यापैकी असलेले सर्व्हे नं. 517/1, स्थित साकळा प्लॉट, लोहगाव रोड, परभणी तहसिल आणि जिल्हा परभणी क्षेत्रफळ एरीया 112.36 चौ.मी. **चतुर्सिमा खालीलप्रमाणे : पूर्वेस** - मोहम्मद अश्रम यांची संपत्ती, **पश्चिमेस** - श्री. निवृत्ती अप्पा शहाने यांची संपत्ती, **उत्तरेस** - शेख अदिब यांची संपत्ती, **दक्षिणेस** - 15 फुट रोड **गहाणदार - शेख फरजाना W/0. मोहम्मद शेख अश्रफ**	रु. 92,05,940/- + लागु न झालेले व्याज आणि इतर शुल्क	रु. 9,00,000/- रु. 90,000/- रु. 10,000/-	23/09/2025 रोजी 14:00:00 ते 18:00:00 वा. पर्यंत **प्रत्येक वाढीव बोलीवर 18:00:00 नंतर वेळ 10 मिनिटांनी वाढवला जाईल**	वास्तविक	17/09/2025 रोजी 10:00:00 ते 17:00:00 वा. पर्यंत

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया https://www.bankofbaroda.in/e-auction.htm आणि ऑनलाईन ऑक्शन पोर्टल https://baanknet.com या वेबसाइट लिंकला पहा/भेट द्या. तसेच, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी दूरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक 9450802051 वर संपर्क साधू शकतात.

येथे स्कॅन करा तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी.

दिनांक : 03/09/2025
स्थळ : अमरावती

(इंग्रजीतील मूळ मजकूर ग्राह्य धरण्यात येईल)

अधिकृत अधिकारी बँक ऑफ बडोदा

वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि.
VASTU HOUSING FINANCE
युनिट २०३ आणि २०४, २रा मजला, 'ए' विंग, नवभारत इस्टेट, झकेरिया बंदर रोड, शिवडी (पश्चिम), मुंबई ४०००१५. महाराष्ट्र.
सीआयएन क्र.: यू६५९२२एमएच२००५पीएलसी२७२५०१

ताबा सूचना

ज्याअर्थी, वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे अधिकृत अधिकारी म्हणून निम्नस्वाक्षरीकार यांनी सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अँण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम २००२ च्या नियम ९ सहवाचता कलम १३(१२) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केलेल्या कर्जदारांना संबंधित सूचनेत नमूद केलेली रक्कम सदर सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत परत करण्याचे आवाहन करणारी मागणी सूचना जारी केली. कर्जदारांनी रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, निम्नस्वाक्षरीकार यांनी खाली नमूद केलेल्या तारखेला सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि सदर नियमांच्या नियम ९ अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.
विशेषत: कर्जदार आणि जामीनदार आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे मालमत्तेचा व्यवहार न करण्याची खबरदारी देण्यात आली आहे आणि मालमत्तेचा कोणताही व्यवहार हा खाली नमूद केलेल्या रकमेसाठी आणि त्यावरील व्याज, खर्च इ. यासाठी वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड शाखेच्या शुल्काच्या विषयाधीन असेल.

अ.क्र.	कर्जदार, सह-कर्जदाराचे नाव आणि एलएएन क्र.	मागणी सूचनेची तारीख आणि रक्कम	मालमत्तेचे वर्णन	ताब्याची तारीख आणि प्रकार
१	संतोष निवृत्ती जाधव, जयश्री संतोष जाधव, एलपी००००००००७९५९८	२०-मे-२५ रु. ८,८५,००७ दि. १३-मे-२५ रोजीनुसार	ग्रामपंचायत मिळकत क्र. ६१३, मोजमापे क्षेत्रफळ ६०० चौ.फूट, देवगाव (रंगारी) येथे स्थित, तालुका कन्नड जि.औरंगाबाद, महाराष्ट्र, ४३१००१ यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल, उत्तर रस्ता, दक्षिण- गोरखनाथ बबनराव सोनवणे, पूर्व- एकनाथ लक्ष्मण जाधव, पश्चिम-एकनाथ लक्ष्मण जाधव.	दि. २८-ऑगस्ट-२५ रोजी प्रतिकात्मक ताबा घेतला

दिनांक : ०३.०९.२०२५
ठिकाण : औरंगाबाद
अधिकृत अधिकारी
वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि.

FEDBANK FINANCIAL SEVICES LTD. FEDBANK FINANCIAL SERVICES LIMITED

नोंदणीकृत कार्यालय: युनिट नं. ११०१, ११वा मजला, सिग्नस, प्लॉट नं. ७१ ए, पवई, पासपोली, मुंबई-४०००८७.

जाहीर सूचना- स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव

याद्वारा स्थावर सुरक्षित मत्तेच्या विक्रीची ३० दिवसीय सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२च्या रुल ८(६) व ९(१) यासह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत **फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड**द्वारा (सुरक्षित धनको) देण्यात आली आहे. सुरक्षित धनकोचे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सरफेसी अॅक्ट २००२ अंतर्गत सुरक्षित मत्तेचा ताबा घेतला आहे. याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको/ सह-ऋणको/ हमीदारांना सूचना देण्यात आली आहे की, सुरक्षित धनको, ''फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड''कडे गहाण असलेल्या/ ताब्यात असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा **फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड**च्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली नमूद केलेले ऋणको व हमीदारांकडील ''फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड'', सुरक्षित धनकोकरिता देय, वसूलीच्या तारखेपर्यंत पुढील व्याज व अन्य खर्च आणि याखाली नमूद केलेल्या देणींच्या वसूलीकरिता याखाली नमूद केलेल्या तारीख व वेळेत **''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'' व ''जे काही आहे तेथे आहे''** या आधारे करण्यात येणार आहे.

इरठेसमवेत मोहोरबंद प्रस्ताव/ निविदेसह बोलींच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख, वेळ व स्थळ उशिरात उशिरा २२ सप्टेंबर, २०२५ रोजी सायं. ०५.०० वा.पर्यंत-''फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड'', तळमजला, यश टॉवर, सीटीएस नं. १३१५६/१, रोकाडिया हनुमान कॉलनी, बीएसएनएल ऑफिससमोर, छत्रपती संभाजीनगर, औरंगाबाद- ४३१००१/ बोली वृद्धी रक्कम रु.५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त)
निश्चित झालेल्या यशस्वी बोलीदाराकरिता स्वीकारलेल्या उच्चतर बोलीच्या २५% च्या प्रदानाकरिता शेवटची तारीख (इठे समाविष्ट) प्रदान बोली निश्चितीकरणाच्या तारखेपासून उशिरात उशिरा कामाच्या पुढील दिवसांपर्यंत केले पाहिजे. उच्चतर बोलीच्या उर्वरित ७५% रकमेच्या प्रदानाकरिता शेवटची तारीख- बोली निश्चितीकरणाच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत
मालमत्तेची पाहाणी १९ सप्टेंबर, २०२५ रोजी सायं. ०५.०० वा.पूर्वी/ लिलाव तारीखः २५.०९.२०२५ रोजी स. १०.०० वा.पासून ते स. १०.३० वा.पर्यंत

ऋणको/ हमीदार/ लोन अकाऊंट	एकूण थकित देणी	राखीव किंमत व इरठे रक्कम
संजय राहूल सराडे (ऋणको) / नेहा राहूल सराडे व परेश प्रकाश जेठाणी (सह-ऋणको) लोन अका. नं.: FEDAUR0HL0511219	रु.३१,२५,६७३/- (रुपये एकतीस लाख पंचवीस हजार सहाशे त्र्यहत्तर फक्त) ३१.०५.२०२५ रोजीप्रमाणे आणि ०१.०६.२०२५ पासून त्यावरील खर्च व व्याजासह	राखीव किंमत (रु.'त) रु.१६,५०,०००/- (रुपये सोळा लाख पन्नास हजार फक्त) / इसारा रक्कम ठेव (रु.'त) ''फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड''च्या नावे डीडी/ पीओ/ आरटीजीएसद्वारा रु.१,६५,०००/- (रुपये एक लाख पासष्ट हजार फक्त)

स्थावर मालमत्तेचे वर्णन: पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- फ्लॅट नं. १, मोजमापाचा ४१.०६ चौ.मी., साजिद राजभवन सीएसएन, ८५८८, कुवरफल्ली राजबाजार, औरंगाबाद- ४३१००१.

विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया www.fedfina.com & Link https://www.fedfina.com/public-notice-for-auction-cum-sale/ under Auction या ''फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड'' (फेडफिना) सुरक्षित धनकोच्या वेबसाइटमध्ये तरतूद केलेली लिंक पाहावी. कोणतीही चौकशी, माहिती, सहाय्य, प्रक्रिया व प्रशिक्षण याकरिता कृपया ''फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड''चे प्राधिकृत अधिकारी- श्री. आसाराम जोगदंड- ९८६७६४६८२४, ईमेल आयडी: asaram.jogdand@fedfina.com यांच्याशी समन्वय साधावा.

दिनांक: ०३.०९.२०२५ स्थळ: औरंगाबाद
स्वाक्षरी/- (प्राधिकृत अधिकारी) फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड

बजाज फायनान्स लिमिटेड BAJAJ FINSERV

नोंदणीकृत कार्यालय : बजाज ऑटो लिमिटेड कॉम्प्लेक्स, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे-४११ ०३५. **शाखा कार्यालय :** पीएन ४८, एन७ व ११, महाराणा प्रताप सीएचएस, मेन रोड, बजरंग चौक, सिडको, औरंगाबाद-४३१ ००३, महाराष्ट्र. **प्राधिकृत अधिकाऱ्याचा तपशील : नाव :** श्री. हर्षद गमरे, **ई-मेल आयडी :** harshad.gamre@bajajfinserv.in, **मोबा नं. :** ९८६७९३४०७३.

परिशिष्ट-IV-A [रुल ८(६)च्या तरतुदी पाहा]
सरफेसी अॅक्ट २००२ अंतर्गत ई-लिलाव विक्री सूचना
सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ (''अॅक्ट'') अंतर्गत स्थावर मालमत्तेची विक्री

आम जनतेस तसेच ऋणको/ सह-ऋणको/ गहाणकारांना याखाली नमूद केलेल्या सुरक्षित मत्तेबाबतीत सूचना देण्यात आली आहे, जी बजाज फायनान्स लिमिटेडकडे (**''बीएफएल''**) गहाण आहे आणि जिचा ताबा अॅक्टच्या तरतुदीअंतर्गत बीएफएलच्या प्राधिकृत अधिकारीद्वारा घेण्यात आला होता व सदर सुरक्षित मत्तेची विक्री याखाली नमूद केलेली रक्कम आणि पुढील लागू व्याज, आकार व किंमत इ.च्या वसुलीकरिता लिलावाद्वारे करण्यात येणार आहे.
याखाली वर्णिलेल्या सुरक्षित मत्तेची विक्री खालीलनुसार सविस्तरपणे दिलेल्या देणींच्या वसुलीकरिता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स (**''रुल्स''**)च्या रुल नं. ८ व ९ अंतर्गत **''जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे काही आहे आणि जे काही आहे तेथे आहे''** याआधारे करण्यात येत आहे :

ई-लिलावाचा तपशील

ऋणको व सह-ऋणकोचे नाव व पत्ता	**महेश प्रकाश कुलकर्णी (ऋणको) पत्ता :** फ्लॅट नं. ५०६, ५वा मजला, बिल्डिंग नं. ए-२, चित्रा नक्षत्रांगण, नक्षत्रवाडी, औरंगाबाद-४३१ ००१, महाराष्ट्र.
लोन अकाऊन्ट नंबर	**417SH025896900 & 417SH025904540**
सेक्शन १३(२) अंतर्गत सांविधिक मागणी सूचना व रक्कम	सूचना दिनांकित **०३-मार्च-२०२३** मागणी रक्कम **रु. २९,८३,४१३/-**
३१.०८.२०२५ रोजीप्रमाणे थकीत रक्कम	रु. ४२,६२,४९९/- (रुपये बेचाळीस लाख बासष्ट हजार चारशे नव्याण्णव फक्त) ३१.०८.२०२५ रोजीप्रमाणे
स्थावर मालमत्तेचे वर्णन	फ्लॅट नं. ५०६, कार्पेट एरिया ४८.७४ चौ.मी. व एकूण बिल्ट-अप एरिया ७०.५० चौ.मी., स्टिल्ट ५वा मजला, ए-२ चित्रा बिल्डिंग 'नक्षत्रांगण' कोन्डोमिनियम, प्लॉट नं. ०१-ए व १-बी यावर बांधकाम केलेला, सेक्टर ८, गट नं. १०२, नक्षत्रवाडी, ता. व जि. औरंगाबाद आणि पुढीलप्रमाणे सीमित : पूर्व : फ्लॅट नं. ५०३, पश्चिम : फ्लॅट नं. ५०५, उत्तर : ओपन स्पेस, दक्षिण : बिल्डिंग सी-१.
राखीव किंमत (एनआयआरमधील)	Rs. 14,85,000/-
इरठे	Rs. 1,48,500/-
ई-लिलावाची तारीख व वेळ	१९.०९.२०२५ रोजी दु. ०३.०० ते सायं. ०५.००
ई-लिलाव पोर्टल	https://bankauctions.in
इरठेच्या सादरीकरणाची शेवटची तारीख	18.09.2025
बोलीवृद्धी रक्कम (रु.त)	Rs. 25,000/-
सुरक्षित धनकोस ज्ञात असलेला भार	ज्ञात नाही
मालमत्तेच्या पाहाणीची तारीख	०४.०९.२०२५ पासून ते १८.०९.२०२५ पर्यंत कामकाजाच्या दिवशी स. ०९.३० ते सायं. ०५.०० भेटीची पूर्ववेळ ठरवून.

आम जनता तसेच विशेषकरून ऋणकोंनी कृपया सूचना घ्यावी की, जर यामध्ये निर्धारित केलेल्या तारखेदिवशी लिलाव, जे काही असेल त्या कोणत्याही कारणास्तव अयशस्वी ठरल्यास, सुरक्षित धनको त्यांना असलेल्या स्वेच्छाधिकारावर खासगी कराराद्वारा सुरक्षित मत्तेची अंमलबजावणी करतील. विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया लिंक पाहावी **https://bankauction.in** व **https://www.bajajfinserv.in/auction-notices**
दिनांक : ०३.०९.२०२५ स्थळ : औरंगाबाद स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी, बजाज फायनान्स लि.

ओमकारा अॅसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड
OMKARA ASSETS RECONSTRUCTION Pvt. Ltd.
सीआयएन : यू६७१००टीझेड२०१४पीटीसी०२०३६३
कॉर्पोरेट कार्यालय : कोहिनूर चौक, ४७ वा मजला, एन.सी.केळकर मार्ग, आर.जी.गडकरी चौक, दादर (पश्चिम), मुंबई-४०० ०२८ । ईमेल : mumbai@omkaraarc.com । मोब.: +९१ ९७६९१७०७७४

[परिशिष्ट- ४-ए] [नियम ९(१) सहवाचता नियम ८(६) ची तरतूद पहा]
स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलावाची जाहीर सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ९(१) आणि नियम ८(६) च्या तरतुदी सहवाचता सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ ('सरफेसी कायदा') अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषत: कर्जदार आणि जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित धनकोकडे गहाण ठेवली आहे/आकारली आहे, ज्याचा ताबा ओमकारा अॅसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे. पुढे, ओमकारा अॅसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (ओमकारा पीएस ३३/२०२०-२१ ट्रस्टचे विश्वस्त म्हणून त्यांच्या क्षमतेनुसार कार्य करत आहे) यांनी असाइनमेंट करार दिनांकित ३०.०३.२०२१ याद्वारे खालील खात्यांची संपूर्ण थकबाकी कर्जे एडेलवाइस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (असाइनर) यांच्याकडून असाइनरकडून अंतर्निहित सुरक्षासह मिळवली आहेत. त्यानुसार, ओएआरपीएलने असाइनरची भूमिका घेतली आहे आणि थकबाकी वसूल करण्याचा आणि सुरक्षा लागू करण्याचा अधिकार दिला आहे. ओएआरपीएलच्या अधिकृत अधिकाऱ्याने दि. ८ फेब्रुवारी २०२५ रोजी खाली नमूद केलेल्या सिक्युरिटीचा प्रत्यक्ष ताबा घेतला. ओएआरपीएल यांचे अधिकृत अधिकारी याद्वारे थकबाकी वसूल करण्यासाठी खाली नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तांची विक्री करण्याचा विचार करीत आहेत आणि म्हणूनच सुरक्षित मालमत्ता खरेदी करण्यासाठी मोहरबंद लिफाफ्यात निविदा/बोली मागविण्यात येत आहेत. सरफेसी कायद्याच्या कलम १३(२) आणि (४) च्या तरतुदींनुसार अधिकार आणि अधिकारांचा वापर करून खाली दर्शविलेल्या संबंधित कर्जदार आणि सह-कर्जदाराकडून सुरक्षित धनको म्हणून ओएआरपीएल यांना देय असलेल्या संबंधित स्तंभात खाली दर्शविलेल्या रकमेच्या वसूलीसाठी मालमत्ता 'जसे आहे तिथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जे काही आहे ते' आणि 'कोणत्याही आधाराशिवाय' यावर विक्री करण्यात येतील. कर्जदार/जामीनदार/गहाण ठेवणारे, सिक्युरिटीज, थकबाकी, कलम १३(२) अंतर्गत पाठवलेल्या मागणी सूचनेची तारीख, आरक्षित किंमत, बोली वाढ रक्कम, इसारा ठेव अनामत (ईएमडी), तपासणीची तारीख आणि वेळ यांचे तपशील खालीलप्रमाणे दिले आहेत :

कर्जदार/ जामीनदार/ गहाण ठेवणारे यांचे नाव	सुरक्षित मालमत्तेचा तपशील	मालमत्तेचा मालक	मागणी सूचना तारीख आणि रक्कम	आरक्षित किंमत	बोली वाढीची रक्कम	ईएमडी	तपासणीची तारीख आणि वेळ
१. अझीम खान (कर्जदार) २. उमामा फजिलत अझीम खान (सहकर्जदार)	धारण मालमत्ता फ्लॅट क्रमांक बी-१८, मोजमापे बिल्ट अप एरिया ८६५.१५ चौ.फूट, रूप महाल, बी विंग सीटी क्र. ११३९५, रझीलपुरा, अझमद हॉस्पिटलसमोर, औरंगाबाद ४३१००१ यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल. द्वारे सीमाबद्ध: उत्तर: फ्लॅट क्र. १९ दक्षिण: श्री. कोर्डे यांचे घर पूर्व: फ्लॅट क्र. १७ पश्चिम: ओपन डक्ट	अझीम खान	रु. ४२,७१,७१२.१६/- (रुपये बेचाळीस लाख एकाहत्तर हजार सातशे बारा आणि सोळा पैसे फक्त) दि. ३१ जुलै २०१९ रोजी थकीत आणि देय.	रु. २४,७५,०००/-	रु. २५,०००/-	रु. २,४७,५००/-	तारीख: २०.०९.२०२५ वेळ: दुपारी १.०० वा. ते दुपारी ३.०० वा. (दुपारी)
ई-लिलावाची तारीख आणि वेळ :			**दि. २४.०९.२०२५ सकाळी ११.०० वा. ते दुपारी २.०० वाजेपर्यंत (दुपारी)**				
सहभागाचे बोली पत्र/केवायसी कागदपत्र/ईएमडीचा पुरावा सादर करण्याची शेवटची तारीख आणि वेळ:			**दि. २३.०९.२०२५ रोजी सायं. ६.०० वाजेपर्यंत**				

लिलावाच्या अटी आणि शर्ती : विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी कृपया http://omkaraarc.com/auction.php यामध्ये दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्या.
सदर हा लिलाव ओएआरपीएल यांच्या माध्यमातून ऑनलाइन केला जाईल. बोली (ऑनलाइन तसेच हार्ड कॉपीमध्ये) ईएमडी (डीडी/ मूळ पे ऑर्डर किंवा एनईएफटी/ आरटीजीएस याद्वारे पैसे पाठवणे) सहित सादर करण्याची शेवटची तारीख **२३.०९.२०२५** रोजी सायं ६.०० वाजेपर्यंत आहे. ज्या इच्छुक बोलीदारांनी ईएमडी जमा केली आहे आणि त्यांना लॉगीन आयडी आणि पासवर्ड तयार करणे, डेटा अपलोड करणे, बोली सादर करणे, ई-बोली प्रक्रियेचे प्रशिक्षण इत्यादींमध्ये मदत हवी आहे, ते ई-लिलाव सेवा प्रदात्याशी 'मेसर्स सी१ इंडिया प्रा. लि.', टेलि.: +९१-७२९१९८११२४/२५/२६, हेल्पलाइन ई-मेल आयडी : support@bankeauctions.com यावर संपर्क साधू शकतात आणि मालमत्तेशी संबंधित कोणत्याही प्रश्नासाठी अधिकृत अधिकारी, प्रतिक्षा पटेल (मोबाइल: ९७७३४०६१७५ मेल : pratiksha.patel@omkaraarc.com यांच्याशी संपर्क साधा.

सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८(६) सहवाचता नियम ९(१) अंतर्गत विक्रीसाठी वैधानिक सूचना
सदर ही सूचना वरील कर्ज खात्याच्या कर्जदाराला सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ (६) सहवाचता नियम ९ च्या तरतुदी सहवाचता सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ च्या तरतुदींनुसार किमान १५ (पंधरा) दिवसांची अनिवार्य सूचना आहे, ज्यामध्ये त्यांना वरील तारखेला आणि वेळेला ई-लिलावाद्वारे लिलाव/विक्री आयोजित करण्याबद्दल माहिती दिली जाईल आणि त्यांना हवे असल्यास, विक्री बंद होण्यापूर्वी येथे नमूद केलेल्या थकबाकीसह पुढील व्याज आणि सर्व खर्च शुल्क आणि खर्च देऊन मालमत्ता परत मिळवण्याचा सल्ला दिला जाईल. देयकात कसूर झाल्यास, मालमत्ता अधिकृत अधिकारी/सुरक्षित धनकोच्या विवेकबुद्धीनुसार सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ (५) अंतर्गत विहित केलेल्या कोणत्याही पद्धतीने विकली जाईल.

दिनांक : ०३.०९.२०२५ **सही/- अधिकृत अधिकारी, ओमकारा अॅसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.**
ठिकाण : मुंबई **(ओमकारा पीएस ३३/२०२०-२१ ट्रस्टचे विश्वस्त म्हणून त्यांच्या क्षमतेनुसार कार्य करत आहे)**

SMFG Grihashakti Nayi Asha. Naya Vishwas.

एसएमएफजी इंडिया होम फायनान्स कं. लि.

कॉर्पोरेट कार्यालय : ५०३ व ५०४, ५वा मजला, जी-ब्लॉक, इन्स्पायर बीकेसी, बीकेसी मेन रोड, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू.), मुंबई-४०० ०५१.
नोंदणीकृत कार्यालय : कॉमरझोन आयटी पार्क, टॉवर 'बी', पहिला मजला, नं. १११, माऊन्ट पुनामल्ली रोड, पोरूर, चेन्नई-६०० ११६, तामिळनाडू.

मागणी सूचना

सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (''अॅक्ट'') आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ (''रुल्स'')च्या तरतुदीअंतर्गत

एसएमएफजी इंडिया होम फायनान्स कं. लि.चे (यापुढे एसएमएचएफसी म्हणून संदर्भित) **प्राधिकृत अधिकारी** असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी अॅक्टअंतर्गत आणि रुल ३ यासह वाचलेल्या अॅक्टच्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संबंधित सूचनांमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता खालील ऋणकोंवर फर्माविणाऱ्या अॅक्टच्या सेक्शन १३(२) अंतर्गत मागणी सूचना निर्गमित केल्या आहेत. निम्नस्वाक्षरीकारांना रास्त विश्वास वाटतो की, ऋणको मागणी सूचना स्वीकारण्यास टाळाटाळ करीत आहेत, त्यामुळे सूचनेची सेवा नियमानुसार प्रत्ययोजन व प्रसिद्धीद्वारा प्रभावी होत आहे. मागणी सूचनेचा समाविष्ट तपशील याखाली नमूद केला आहे :

अ. क्र.	लोन अकाऊन्ट नं. व ऋणको/ सह-ऋणकोचे नाव/ मालमत्ताधारकाचे नाव, जसे असे त्यानुसार	सुरक्षित मत्ता/ गहाणवट मालमत्तेचे वर्णन	सेक्शन १३(२) अंतर्गत मागणी सूचना तारीख व एकूण थकीत रक्कम
१.	**एलएएन : ६०६२०७५१०६९८९९२ १. शेख सत्तार शेख लतिफ २. रुबिना तांबोळी ३. किसन इंडस्ट्रीज पत्ता :** सर्व्हे नं. ५३८, एच. नं. १४, युसूफ कॉलनी, जुना जालना, जालना-४३१ २०३.	प्लॉट नं. १४, मोजमापाचा १५५ चौ.मी., सीटीएस नं. ८४३१/ए-१४, सर्व्हे नं. ५३८, जालना व पुढीलप्रमाणे सीमित : **पूर्व :** प्लॉट नं. १५, **पश्चिम :** ६ मी. रोड, **दक्षिण :** प्लॉट नं. १३, **उत्तर :** १५ मी. रोड - प्लॉट नं. १५, मोजमापाचा ४८.९४ चौ.मी., सीटीएस नं. ८४३१/ए-१५, सर्व्हे नं. ५३८, जालना व पुढीलप्रमाणे सीमित : **पूर्व :** प्लॉट नं. १५/पार्ट, **पश्चिम :** प्लॉट नं. १३ व १४, **उत्तर :** १५ मी. रोड, **दक्षिण :** प्लॉट नं. १६.	**१३.०८.२०२५ रु. ३५,१३,७४६.५८/-** (रुपये पस्तीस लाख तेरा हजार सातशे शेहेचाळीस व पैसे अठ्ठावन्न फक्त) **११.०८.२०२५** रोजीप्रमाणे एनपीए तारीख : **०५.०८.२०२५**
२.	**एलएएन : ६०४९०७५१०६००२४६ १. नितीन सुरेश पाटील २. कविता नितीन पाटील पत्ता :** १५१/१, १५२/२, १५२/३, बंगलो 'रेश्माई', प्लॉट नं. ८३, बहिराम नगर, पाचोरा-४२४ २०१.	प्लॉट नं. ८३ यावर बांधकाम केलेले हाऊस, मोजमापाचा ३०७.५० चौ.मी., प्लॉट्सपैकी गॅट नं. १५२/१ + १५२/२ + १५२/३ यामध्ये वर्णिलेले व येथे स्थित- पाचोरा, ता. पाचोरा, जि. जळगाव, पाचोरा म्युनिसिपल काऊन्सिलच्या मर्यादेत, उप-नोंदणी कार्यालय, पाचोरा, वर्णिलेली मालमत्ता पुढीलप्रमाणे सीमित आहे : **पूर्व :** १८.०० मी. रोड, **पश्चिम :** प्लॉट नं. ७३ए व बी, **उत्तर :** प्लॉट नं. ८२, **दक्षिण :** प्लॉट नं. ८४. २. प्लॉट नं. ७३/बी, मोजमापाचा ११२.५० चौ.मी., प्लॉट्सपैकी गॅट नं. १५२/१ + १५२/२ + १५२/३ यामध्ये वर्णिलेले व येथे स्थित- पाचोरा, ता. पाचोरा, जि. जळगाव, पाचोरा म्युनिसिपल काऊन्सिलच्या मर्यादेत, उप-नोंदणी कार्यालय पाचोरा, वर्णिलेली मालमत्ता पुढीलप्रमाणे सीमित : **पूर्व :** प्लॉट नं. ८३, **पश्चिम :** ९.०० मी. रोड, **उत्तर :** प्लॉट नं. ७४/ए, **दक्षिण :** प्लॉट नं. ७३/ए. ३. प्लॉट नं. ७३/ए, मोजमापाचा ११२.५० चौ.मी., प्लॉट्सपैकी गॅट नं. १५२/१ + १५२/२ + १५२/३ यामध्ये वर्णिलेले व येथे स्थित- पाचोरा, ता. पाचोरा, जि. जळगाव, पाचोरा म्युनिसिपल काऊन्सिलच्या मर्यादेत, उप-नोंदणी कार्यालय पाचोरा, वर्णिलेली मालमत्ता पुढीलप्रमाणे सीमित : **पूर्व :** प्लॉट नं. ८३, **पश्चिम :** ९.०० मी. रोड, **उत्तर :** प्लॉट नं. ७४/ए, **दक्षिण :** प्लॉट नं. ७२/बी.	**१३.०८.२०२५ रु. ९०,८५,२७४.३७/-** (रुपये नव्वद लाख पंच्याऐंशी हजार दोनशे चौऱ्याहत्तर व पैसे सदतीस फक्त) **१३.०८.२०२५** रोजीप्रमाणे एनपीए तारीख : **०६.०७.२०२५**

ऋणकोंना याद्वारा सल्ला देण्यात येतो की, त्यांनी मागणी सूचनांचे अनुपालन करावे आणि प्रदानाच्या वसुलीच्या तारखेपर्यंत लागू व्याज, अतिरिक्त व्याज, बाऊन्स आकार, किंमत व खर्च यासह एकत्रित या प्रसिद्धीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत यावर दिलेली आणि त्यात नमूद केलेल्या मागणी रकमेचे प्रदान करावे. ऋणकोंनी नोंद घ्यावी की, **एसएमएचएफसी** ही सुरक्षित धनको आहे आणि ऋणकोंद्वारा लाभ घेतलेली कर्ज सुविधा ऋणकोद्वारा गहाण ठेवलेल्या सुरक्षित मत्ता म्हणून असलेल्या स्थावर मालमत्तेनुसार सुरक्षित ऋण आहे. जर ऋणको विनिर्दिष्ट वेळेच्या आत त्यांची दायित्वे संपूर्णपणे सोडविण्यास असमर्थ ठरल्यास, **एसएमएचएफसी** समाविष्ट सुरक्षित मत्तेचा ताबा घेण्याकरिता अॅक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत; परंतु प्रदानाची वसूली आणि अॅक्ट व त्याखालील रुलअंतर्गत उपलब्ध अन्य कोणत्याही मार्गे विनंती करून किंवा विक्रीद्वारा किंवा सदर मालमत्तेच्या हस्तांतरणाच्या मयदित नसलेले, सर्व हक्कांच्या अंमलबजावणीस हक्कदार असेल. **एसएमएचएफसी**कडे विक्री किंवा हस्तांतरणाकरिता हक्कांचा वापर करण्यापूर्वी सुरक्षित मत्ता **मोहोरबंद करणे आणि/ किंवा जप्त करण्याचा** अधिकारसुद्धा आहे. सुरक्षित मत्तेच्या विक्रीनंतर, जर **एसएमएचएफसी**च्या देय रकमेची वसुली अपुरी पडल्यास गहाण असलेल्या मालमत्तेच्या मूल्याबाबत उर्वरित देणींच्या वसुलीकरिता **एसएमएचएफसी**कडे स्वतंत्र विधि प्रक्रिया सुरू करण्याचा हक्कसुद्धा आहे. हा कोणत्याही अन्य अॅक्टअंतर्गत **एसएमएचएफसी**कडे उपलब्ध अन्य सर्व अतिरिक्त आणि स्वतंत्र उपाय आहे. सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता अॅक्टच्या सेक्शन १३(८) आणि पुढे अॅक्टच्या सेक्शन १३(१३)कडे ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत, ज्यायोगे ऋणकोंना **एसएमएचएफसी**च्या पूर्वलेखी परवानगीशिवाय, सुरक्षित मत्तेचा व्यवहार किंवा कोणत्याही सुरक्षित मत्तेची विक्री, भाडेपट्टा किंवा अन्यथा कोणत्याही (अन्य सामान्य व्यवसायाखेरीज) तऱ्हेने त्याची वासलात लावण्यास मना केलेली आहे/ प्रतिबंधित करण्यात आले आहे आणि त्याचे अनुपालन न झाल्यास उक्त अॅक्टच्या सेक्शन २९ अंतर्गत दंडनीय गुन्हा आहे. मागणी सूचनेची प्रत निम्नस्वाक्षरीकारांकडे उपलब्ध आहे आणि ऋणको, जर ते इच्छुक असल्यास, सदर प्रत नेहमीच्या कार्यालयीन वेळेत कामाच्या कोणत्याही दिवशी निम्नस्वाक्षरीकारांकडून गोळा करू शकतील.

स्थळ : जालना, जळगाव, महाराष्ट्र स्वाक्षरी/-
दिनांक : १३.०८.२०२५ प्राधिकृत अधिकारी, एसएमएफजी इंडिया होम फायनान्स कं. लि.